# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रो आणि रीडिंग कीडा लायब्ररी यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

नागपूर : महा मेट्रो आणि रीडिंग कीडा लायब्ररी यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ७ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी 10.30 ते 12.00 या वेळेत एअरपोर्ट मेट्रो स्टेशन येथे संपन्न होणार आहे. नागपूर शहरातील विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची आवड वाढविणे, तसेच मेट्रो सेवेविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश असून महा मेट्रोने नागपूरमधील इयत्ता ५वी ते १०वी मधील सर्व विद्यार्थ्यांना या स्पर्धेत उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ही स्पर्धा पूर्णपणे निःशुल्क असून मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या तीनही भाषांमध्ये निबंध लिहिण्याची निवड विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. शब्दमर्यादा ५०० शब्द इतकी ठेवण्यात आली आहे.

निबंध स्पर्धेचा विषय १) मेट्रो कोचची आत्मकथा,२)माझा मेट्रोने शाळेचा प्रवास,३) मेट्रो डब्याची आत्मकथा, मेट्रोने मी शाळेत जातो/जाते तेव्हा आणि मेट्रोतून दिसणारे शहराचे दृश्य. स्पर्धेचे नियम : प्रत्येक विद्यार्थ्यास फक्त एकच प्रवेशिका मान्य,सहभाग मोफत, मात्र नोंदणी अनिवार्य,निबंध स्वतः विद्यार्थ्यांनी लिहिलेलाच असावा,प्रवेशिका निर्धारित वेळेतच स्वीकारल्या जातील.

प्रत्येक भाषेतील पहिल्या तीन विजेत्यांना महा कार्ड,रीडिंग कीडा लायब्ररीचे एक महिन्याचे मोफत सदस्यत्व, क्युरेटेड बुक सेटखालील बक्षिसे देण्यात येतील.

उल्लेखनीय आहे कि नागपूर शहरातील मोठ्या संख्येने विद्यार्थी दररोज शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी नागपूर मेट्रोची सुरक्षित, वेगवान आणि पर्यावरणपूरक सेवा वापरतात. वेळेवर प्रवास व आरामदायी सुविधा यामुळे मेट्रो विद्यार्थ्यांमध्ये विशेष लोकप्रिय झाली असून, विद्यार्थ्यांचा नेहमीचा मेट्रो प्रवासच त्यांच्या निबंधांना नव्याने प्रेरणा देईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.